# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 17 January 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १७ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- वाहन उद्योगात हरित तंत्रज्ञान संशोधनावर केंद्र सरकारचा अधिक भर– पंतप्रधानांचं प्रतिपादन
- नाशिक इथल्या आगामी कुंभमेळ्यात देशभरातील धार्मिक परंपरेचे दर्शन घडवणारा महाकुंभ उभारण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
- राज्य सरकारचं कृत्रीम बुद्धिमत्ता धोरण तयार करण्यासाठी कृती दलाची स्थापना
- पुणे–नाशिक महामार्गावर भीषण अपघातात ९ जणांचा मृत्यू

आणि

- राष्ट्रीय खेल पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान

****

वाहन उद्योगात हरित तंत्रज्ञानाच्या संशोधनावर आपल्या सरकारचा अधिक भर असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं भारत ग्लोबल मोबिलिटी एक्स्पोच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. गेल्या वर्षी भारताचं ऑटो क्षेत्र जवळपास १२ टक्क्यानं वाढलं, मेक इन इंडिया अंतर्गत तयार होणाऱ्या गाड्यांची निर्यातही वाढल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. जीवाश्म इंधनावरचा भार कमी करण्यासाठी हरित ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहनं यावर भर देत असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं, ते म्हणाले –

***आज हम एक ऐसे मोबिलिटी सिस्टीम के निर्माण में जुटे है, जो इकॉनॉमि और इकोलॉजी दोनों को सपोर्ट करें। एक ऐसा सिस्टीम जो फॉसिल फ्युअल के हमारे इंपोर्ट बिल को कम करें। इसलिये आज***

***ग्रीन टेक्नॉलॉजीज्, ईव्हीज्, हायड्रोजन फ्युअल्स, बायोफ्युअल्स ऐसी टेक्नॉलॉजी के डेव्हलपमेंटपर हमारा काफी फोकस है।***

वाहन उद्योगावर बोलतांना पंतप्रधानांनी दिवंगत रतन टाटा आणि ओसामो सुझुकी यांचं स्मरण केलं. वाहन क्षेत्रातल्या प्रगतीच्या वाटेवर मध्यमवर्गीय माणसांची स्वप्नं पूर्ण करण्यात या दोघांचं मोठं योगदान असल्याची कृतज्ञ भावना पंतप्रधानांनी व्यक्त केली.

****

प्रयागराज इथं महाकुंभ मेळ्यात पहिल्या ४ दिवसात ७ कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केलं आहे. महाकुंभाच्या आज पाचव्या दिवशीही भाविकांचा अखंड ओघ सुरूच आहे. अनेक भाविकांनी संत महंतांच्या तंबुत जाऊन त्यांचे आशीर्वाद घेतले आणि कथांचं श्रवण केलं. येत्या २९ जानेवारी रोजी मौनी अमावस्येच्या दिवशी स्नानासाठी ६ कोटींहून अधिक भाविकांच्या गर्दीची शक्यता लक्षात घेऊन विशेष रेल्वेगाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

****

नाशिक इथं २०२७च्या ऑगस्ट ते नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात देशभरातील धार्मिक परंपरेचे दर्शन घडावं, यासाठी एक मोठा महाकुंभ तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. ते आज यासंदर्भातल्या आढावा बैठकीत बोलत होते. या महाकुंभामध्ये देशभरातली मंदिरं, तीर्थक्षेत्रं, तसंच सांस्कृतिक वारशाचं भाविकांना दर्शन घेता येईल, असं मोठं संमेलन केंद्र उभारण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. इतर सुविधांच्या नियोजनाचाही त्यांनी आढावा घेतला.

****

स्वित्झर्लंड देशात दावोस इथं येत्या २० ते २४ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये मुख्यमंत्री सहभागी होणार आहेत. सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करणाऱ्या महाराष्ट्रात सर्व क्षेत्रात आणि सर्व विभागात, आणखी गुंतवणूक आणण्याच्या हेतूने या दावोस दौऱ्यात प्रयत्न करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

****

राज्य सरकारनं आर्टिफिशियल इंटिलिजन्स – अर्थात कृत्रीम बुद्धिमत्ता धोरण तयार करण्यासाठी कृती दलाची स्थापना केली आहे. राज्याचे माहिती तंत्रज्ञान संचालक या कृती दलाचे अध्यक्ष आहेत. गुगलच्या AI विभागाचे प्रमुख नरेन कचरू, महिंद्रा समूहाच्या AI विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भुवन लोढा, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू राजन वेळूकर यांच्यासह एकूण १६ जणांचा या कृती दलात समावेश आहे. या कृती दलाला आपल्या शिफारसी सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. ए आय धोरण ठरवणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरलं आहे.

राज्यात सायबर सुरक्षा धोरण कार्यदलाची स्थापनाही आज करण्यात आली. माहिती आणि तंत्रज्ञान आणि मंत्री आशिष शेलार यांनी ही माहिती दिली. या कार्यदलाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या आयटी आणि डिजिटल पायाभूत सुविधांची सुरक्षा आणि संरक्षण करण्यात येणार आहे.

****

पुणे–नाशिक महामार्गावर नारायणगाव जवळ आज सकाळी १० वाजेच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला तर ३ जण जखमी झाले आहेत. आयशर टेम्पो चालकाने प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनाला जोरदार धडक दिली. हे वाहन पुढे जाऊन, उभ्या असलेल्या एसटी बसला धडकलं आणि हा अपघात झाला. मृतांमध्ये ४ महिला, चार पुरुष आणि ५ वर्षाच्या एका बालिकेचा समावेश आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त करत, मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे.

****

राष्ट्रीय खेल पुरस्कार आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात देशातला सर्वोच्च क्रीडा सन्मान बुद्धिबळाचा जगज्जेता डी गुकेश, हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग, पॅरा ॲथलीट प्रवीण कुमार, आणि नेमबाज मनु भाकर यांना प्रदान करण्यात आला.

***सुश्री मनू भाकेर देश के उत्कृष्ट निशानेबाजी खिलाडियों मे से एक है। उनकी उपलब्धीयों मे है, 2024 ऑलिंपिक खेलों में व्यक्तिगत तथा मिश्रित टीम दोनों में कांस्य पदक। सु श्री मनू भाकेर को निशानेबाजी***

***में खेल में उनकी उत्कृष्ट उपलब्धियों को मान्यता प्रदान करते हुये, वर्ष 2024 के लिये मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार प्रदान किया जाता है।***

३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कारानं गौरवण्यात आलं. क्रीडा प्रशिक्षकांना देण्यात येणारा द्रोणाचार्य पुरस्कार नेमबाजी प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांच्यासह ५ जणांना प्रदान करण्यात आला. महाराष्ट्रातला नेमबाज स्वप्नील कुसाळे आणि पॅरा अथलीट सचिन खिलारी यांच्यासह ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आलं. ज्येष्ठ खेळाडू सुचा सिंग आणि दिव्यांग जलतरणपटू मुरलीकांत पेटकर यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कार देण्यात आला.

***श्री मुरलीकांत राजाराम पेटकर। देश के सबसे उत्कृष्ट पॅरा तैराकी खिलाडियों मे से एक है। उन्होंने 1972 में पॅरालंपिक्स मे स्वर्ण पदक, 1970 मे राष्ट्रमंडल पॅराफेजिक खेलों मे स्वर्ण पदक हासिल किया। श्री मुरलीकांत राजाराम पेटकर को पॅरा तैराकी खेल में उनकी उत्कृष्ट उपलब्धियों को मान्यता प्रदान करते हुये, वर्ष 2024 के लिये जीवन पर्यंत अर्जून पुरस्कार प्रदान किया जाता है।***

विद्यापीठ खेलो इंडिया क्रीडास्पर्धांमधे सर्वाधिक पदकं मिळवणाऱ्या चंडीगढ विद्यापीठाला मौलाना अबुल कलाम आझाद करंडक राष्ट्रपतींनी प्रदान केला. महाराष्ट्रातले ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांना देखील आज राष्ट्रपतींच्या हस्ते साहसी क्रीडा क्षेत्रातील कामगिरीबद्दल प्रतिष्ठेचा तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार २०२३ प्रदान करण्यात आला.

****

खो–खो विश्व चषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत आज भारतीय पुरुष आणि महिला संघांचे सामने होणार आहेत. सायंकाळी ७ वाजता भारतीय महिला संघाचा सामना बांग्लादेशच्या संघाशी होईल. तर रात्री सव्वा आठ वाजता भारतीय पुरुष खो खो संघाचा सामना श्रीलंकेशी होणार आहे.

****

राज्यस्तरीय शालेय थ्रोबॉल स्पर्धेत धाराशिव तालुक्यात वडगांव सिद्धेश्वर जिल्हा परिषद प्रशालेच्या संघानं सुवर्णपदक पटकावलं आहे. कोल्हापूर इथं झालेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत अंतिम सामन्यात अमरावती संघाला पराभूत करून वडगाव जिल्हा परिषद प्रशालेच्या संघाने सुवर्णपदक मिळवलं.

****

परभणी इथं महिला आणि बालविकास विभागाचा चाचा नेहरु बालमहोत्सव आजपासून सुरू झाला. या तीन दिवसीय महोत्सवात मैदानी स्पर्धा, इनडोअर स्पर्धा आणि सांस्कृतिक स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळेल, असं जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी म्हटलं आहे.

****

तिसरं अखिल भारतीय मराठा महासंमेलन उद्या १८ आणि परवा १९ तारखेला रत्नागिरीत होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार नारायण राणे यांना या संमेलनात दी ग्रेट मराठा पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. इतिहासकार डॉ.जयसिंगराव पवार यांना अखिल मराठा समाजरत्न पुरस्कार दिला जाणार असून, आणखीही अनेक नामवंत व्यक्तींना विविध पुरस्कारांनी गौरवलं जाणार आहे.

****

नागरिकांना शासनाच्या विविध सेवा, योजनांचा लाभ विहीत कालावधीत मिळण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम तयार करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने नागरिकांना वेळेवर सेवा उपलब्ध करुन देण्याची सूचना छत्रपती संभाजीनगरचे राज्य लोकसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी केली आहे. परभणी इथे या संदर्भातल्या आढावा बैठकीत ते आज बोलत होते.

****

लातूर तहसील कार्यालयात येत्या सोमवारी २० जानेवारी रोजी तालुकास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात येणार आहे. लातूर तालुक्यातील इच्छुकांनी विहित नमुन्यात २ प्रतीतील अर्ज तहसील कार्यालयात सादर करावेत, असं आवाहन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केलं आहे.

****

नांदेड इथे उद्या १८ जानेवारी रोजी नियोजित सकल मराठा समाजाचा आक्रोश मोर्चा स्थगित करण्यात आला आहे. मराठा आंदोलक श्याम पाटील वडजे यांनी आज नांदेड इथे पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

****

धाराशिव जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी आपले नियोनबद्ध प्रयत्न सुरू असून पर्यटन, उद्योग आणि शाश्वत सिंचनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करण्यासाठी आपण एक कालबद्ध कृती कार्यक्रम आखला असल्याचं आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटलं आहे.

****